मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# पिंपरी महापालिकेचे मनुष्यबळ वाढणार!

## नोव्हेंबरअखेर ३६८ कर्मचारी रुजू होणार

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिकेच्या वतीने घेण्यात आलेल्या नोकरभरती परीक्षेतील उत्तीर्ण उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. पात्र उमेदवारांची अंतिम यादी दिवाळीनंतर प्रसिद्ध केली जाणार असून, महिनाअखेरीस ३६८ उमेदवारांना विविध पदांवर रुजू करून घेण्यात येणार आहे. त्यामुळे महापालिकेचे मनुष्यबळ वाढणार आहे.



महापालिकेच्या वेगवेगळ्या १५ पदांच्या ३६८ जागांसाठी मे महिन्यामध्ये तीन दिवस राज्यभरातील विविध केंद्रांवर ऑनलाइन परीक्षा घेण्यात आली. परीक्षेनंतर ११ पदांसाठीच्या ३५ जागांचा निकाल सात ऑगस्टला जाहीर झाला. त्यात अतिरिक्त कायदा सल्लागार, विधी अधिकारी, उपमुख्य अग्निशमन अधिकारी, विभागीय अग्निशमन अधिकारी, उद्यान निरीक्षक (वृक्ष), उद्यान निरीक्षक, हॉर्टिकल्चर सुपरवायझर, कोर्ट लिपीक, ॲनिमल किपर, समाजसेवक, आरोग्य निरीक्षक या पदांचा समावेश होता. लिपीक, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (विद्युत), स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या चार पदांसाठी ३० हजार ५८१ जणांनी परीक्षा दिली होती. त्यांचा निकाल ३० ऑगस्टला जाहीर करण्यात आला. आरक्षणानुसार पात्र उमेदवारांची कागदपत्रे तपासणीचे काम नुकतेच पूर्ण झाले आहे. सादर केलेली प्रमाणपत्रे शासकीय मान्यताप्राप्त संस्थेचे आहेत की नाही हे तपासणे सुरू आहे. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर समितीची मंजुरी घेऊन पात्र उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्यात येईल. त्यासाठी १५ दिवसांचा कालावधी लागणार आहे.

> “ कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाल्यावर अंतिम पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर विविध पदांसाठी ३६८ जणांना महापालिकेत रुजू करून घेतले जाईल. ही प्रक्रिया नोव्हेंबरअखेरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.
>
> -विठ्ठल जोशी, उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी-चिंचवड

# वंचित घटकांसाठी पुढाकार घेणे गरजेचे : चंद्रकांत पाटील

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्यातर्फे दीपावली फराळाचे वाटप



**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** सर्वत्र दिवाळी आनंदाने आणि उत्साहाने साजरी होत असताना समाजातील निराधार, गरीब मात्र या आनंदापासून दूर राहू नयेत. या वंचित घटकांना देखील दीपावलीचा आनंद घेता यावा, यासाठी सर्वानीच पुढाकार घेणे गरजेचे आहे, असे मत राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले. चिंचवड येथील पुनरुत्थान समरसता गुरुकुलम येथील गरीब आणि अनाथ मुलांसाठी आज दीपावली साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे अध्यक्ष पद्मश्री गिरीशजी प्रभुणे, भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप, माजी नगरसेवक राजाभाऊ बराटे, कार्यवाह सतीश गोरडे, विश्वस्त मिलिंदराव देशपांडे, कोशाध्यक्ष रवी नामदे, सदस्य आसाराम कसबे, 'डीआरडीओ'चे शास्त्रज्ञ डॉक्टर अशोक नगरकर, शिक्षण विभाग प्रमुख प्रा. दिगंबर ढोकले, अतुल आडे, योगेश चिंचवडे, अजित कुलथे, रवींद्र देशपांडे आदी उपस्थित होते. यावेळी माजी नगरसेवक राजाभाऊ बराटे यांच्या वतीने गुरुकुलम येथील मुलांना नवीन कपड्यांचे वाटप करण्यात आले. भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या वतीने या विद्यार्थ्यांसाठी फराळाचे साहित्याचे वाटप करण्यात आले. शंकर जगताप म्हणाले की, दीपावली हा दिव्यांचा सण असून या सणामध्ये प्रत्येक जण आनंद व्यक्त करत असतो. गरीब, निराधार या मुलांना देखील आनंद व्यक्त करण्याचा अधिकार आहे. दीपावलीच्या निमित्ताने आम्ही सर्व जण आपल्यासोबत आहोत, हा विश्वास मुलामध्ये निर्माण करण्याचा हा छोटासा प्रयत्न आमच्या वतीने करण्यात आला.

> “ वंचित, निराधार मुले देखील सामाजाचा घटक आहेत. यांना देखील आपल्या प्रमाणे सण, समारंभ यांचा आनंद घ्यायचा असतो. परंतू, त्यांना त्यांच्या परिस्थितीमुळे या गोष्टींचा आनंद घेता येत नाही. यासाठीच सर्वानीच या मुलांना मुख्य प्रवाहात समाविष्ट करून घेण्यासाठी आपल्या परीने प्रयत्न करणे गरजेचे आहे.
>
> — शंकर जगताप, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# पुनावळेतील प्रस्तावित कचरा भूमीला गृहनिर्माण संस्थांचा विरोध!

## महापालिकेला नोटीस, दिला 'हा' इशारा

**पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुनावळेतील प्रस्तावित कचरा भूमीची आरक्षित जागा १५ वर्षांनंतर ताब्यात घेण्याच्या हालचाली महापालिकेने सुरू करताच परिसरातील गृहनिर्माण संस्थांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. २००८ मध्ये आरक्षण टाकण्यात आले होते. आता हा प्रकल्प कालबाह्य झाला आहे. त्यामुळे प्रकल्पाचा पुनर्विचार करण्यासाठी पिंपरी-चिंचवड को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी फेडरेशनने ॲड. सत्येंद्र मुळे यांच्यामार्फत महापालिकेला कायदेशीर नोटीस पाठविली आहे. प्रकल्प रद्द करावा अन्यथा उच्च न्यायालयात धाव घेण्याचा इशारा दिला आहे. महापालिकेने



पुनावळेत २००८ मध्ये कचरा भूमीचे आरक्षण टाकले होते. त्यावेळी या भागात नागरिकरण कमी होते. महापालिकेने १५ वर्षे प्रकल्प विकसित केला नाही. कोणतीही कार्यवाही केली नाही. आता या परिसरात मोठ मोठ्या गृहनिर्माण संस्था झाल्या आहेत. पुनावळे भागात एक लाखाहून अधिक नागरिक राहतात. हिंजवडी माहिती व तंत्रज्ञाननगरी जवळ असल्याने नागरिक पुनावळेत वास्तव्यास प्राधान्य देतात. गृहप्रकल्प, शैक्षणिक संस्था, रुग्णालये उभारली आहेत. प्रस्तावित कचरा डेपोपासून २०० ते ४०० मीटर अंतरावर मोठ्या गृहनिर्माण संस्था आहेत. परिसराचा विकास झाल्याने घरांच्या किमती वाढल्या. महागड्या सदनिका खरेदी केल्या. या भागाचे नागरीकरण वाढत असताना महापालिकेने कोणतीही कारवाई केली नाही. येथे कचरा प्रकल्प होणार आहे,

> **“ महापालिका १५ वर्षांनंतर कालबाह्य झालेला प्रस्ताव पुढे रेटण्याचा प्रयत्न करत आहे. पुनावळेत एक लाखाहून अधिक लोकसंख्या झाली आहे. येथे प्रकल्प झाल्यास मोठ्या प्रमाणात पर्यावरणाची हानी होणार आहे. त्यामुळे प्रकल्पाचा पुनर्विचार करण्याची विनंती कायदेशीर नोटीसद्वारे करण्यात आली आहे. महापालिकेने यावर योग्य निर्णय न घेतल्यास लवकरच कचरा प्रकल्पाविरोधात उच्च न्यायालयात जाणार आहोत.**
>
> **-ॲड. सत्येंद्र मुळे**

गृह प्रकल्प उभारून नये, अशी सूचनाही केली नाही. या उलट या भागातील सर्व गृह प्रकल्पांना महापालिकेने परवानगी दिली. मात्र, २००८ ते २०२३ या काळात कोणताही प्रकल्प उभारण्यात आला नाही. गेल्या काही दिवसांपासून येथे कचरा प्रकल्प उभारणार असल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे नागरिकांनी विरोधाची भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे.

# महापालिका आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रम

## 'शब्द, सुर आणि तालांच्या' मैफिलीने रसिकांना मनोरंजनाचे अभ्यंगस्नान







**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित केलेल्या दिवाळी पहाट या कार्यक्रमात शब्द,सुर आणि तालांच्या मैफिलीने रसिकांना आज मनोरंजनाचे अभ्यंगस्नान घडले. पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचालित भारतरत्न पंडित भीमसेन जोशी संगीत अकादमीच्या वतीने आयोजित दिवाळी पहाट या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलनाद्वारे उद्घाटन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते संपन्न झाले. चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे झालेल्या या कार्यक्रमास आयुक्त यांच्यासह त्यांचे वडील चंद्रहास सिंह, क्रीडा विभागाचे उपायुक्त मिनीनाथ दंडवते, विशेष अधिकारी किरण गायकवाड, क्रीडा अधिकारी अनिता केदारी, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, अकादमीचे पर्यवेक्षक अरुण कडूस तसेच क्रीडा विभागाचे अधिकारी आणि क्रीडा पर्यवेक्षक तसेच इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीस चिराग कट्टी यांनी सतार वादन सादर केले,

त्यांनी आपल्या खास शैलीत राग भटियार सादर केला, सुरुवातीला आलाप जोड झाला आणि त्यानंतर विलंबित तीनताल आणि त्यानंतर मध्यलय आणि द्रुतलय तीनतालामध्ये गतीचे सादरीकरण केले, त्यांना तबल्यावर साथ विनोद सुतार यांनी केली. यानंतर ख्यातनाम गायिका स्मिता देशमुख यांनी शास्त्रीय गायनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. देशमुख या मेवाती घराण्याच्या गायिका आहेत,त्यांना तबला साथ संतोष साळवे यांनी, हार्मोनियमची साथ ओजस रानडे तर त्यांना तानपुराची साथ भाग्यश्री लोहार आणि नीलिमा बोरकर यांनी केली. सुरुवातीला राग अहिर भैरव आणि त्यानंतर अभंग अवघे गरजे पंढरपुर सादर करून त्यांनी आपले गायन पूर्ण केले. दूस-या सत्रात व्हायोलिन आणि बासरी यांची जुगलबंदी म्हणजेच सहबादन सादर झाले. प्रसिद्ध व्हायोलिन वादक मानस कुमार आणि प्रसिद्ध बासरी वादक पंडित विवेक सोनार यांनी राग नटभैरव मध्ये विलंबित झपताल आणि त्यानंतर मध्यलय तीन ताल सादर केला. त्यानंतर पहाडी धून वाजवून त्यांनी आपल्या जुगलबंधी कार्यक्रमाची सांगता केली. त्यांना तबल्यावर साथ पंडित समीर सूर्यवंशी यांनी दिली. आजच्या दिवाळी पहाट कार्यक्रमाची सांगता जगद्विख्यात गायक पंडित शौनक अभिषेकी यांच्या गायनाने झाली त्यांनी राग शुद्ध सारंग रागामध्ये बडाख्याल आणि छोटाख्याल तसेच चतरंग सादर केला, त्यानंतर लोकाग्रहास्तव खटतोडी रागामध्ये अध्धा तीनताल आणि द्रुत एकताल मध्ये बंदिशी आणि तराना सादर करून रसिकांची वाहवा मिळवली आणि सर्वात्मका सर्वेश्वरा या भैरवीने आपल्या गायनाची सांगता केली. यांना तबला साथ संतोष साळवे आणि हार्मोनियम साथ उदय कुलकर्णी यांनी केली. यावेळी आयुक्त शेखर सिंह यांनी शहरवासीयांना दिपावली निमित्त शुभेच्छाही दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक आणि मिलिंद दलाल यांनी केले आणि प्रस्तावना,आभार प्रदर्शन समीर सूर्यवंशी यांनी केले.

# सिकंदर शेख नवा महाराष्ट्र केसरी!

## शिवराज राक्षेचा पराभव करत पटकवली चांदीची गदा

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
पुण्यातल्या फुलगावमध्ये सुरु असलेल्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेचा निकाल हाती आला आहे. गतविजेत्या शिवराज राक्षेला आस्मान दाखवत सिकंदर शेखने महाराष्ट्र केसरी हा पुरस्कार जिंकला आहे. मानाची गदा उंचावत त्याने उपस्थितांना अभिवादन केलं आणि आपला विजय साजरा केला. सिकंदर शेख ६६ व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेचा विजेता ठरला आहे.

महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेची अंतिम फेरी ही महत्त्वाची होती. या फेरीत सिकंदरचे पारडे जड होते. मात्र शिवराज राक्षे त्याला आव्हान देईल असंही अनेकांना वाटत होतं. मात्र वेगवान आणि आक्रमक कुस्ती खेळणाऱ्या सिकंदरपुढे शिवराज राक्षेचा निभाव लागला नाही.

लढत सुरु झाल्यानंतर झोळी डाव घेत शिवराजला उचलून



खाली घेतले आणि चितपट करुन विजय मिळवला. माती विभागातून संदीप मोटेचा पराभव करुन सिकंदर शेखने अंतिम फेरी गाठली होती. तर गादी विभागातून हर्षद कोकाटेला पराभवाची धूळ चारत शिवराज राक्षे दुसऱ्यांदा महाराष्ट्र केसरीच्या अंतिम फेरीत धडकला होता. या दोघांमधली लढत अत्यंत चुरशीची झाली. या लढतीत शिवराज राक्षेचा पराभव करत सिकंदर शेखने मैदान मारलं आणि महाराष्ट्र केसरीच्या गदेवर आपलं नाव कोरलं. सिकंदर शेखचं मूळ गाव सोलापूर जिल्ह्यातलं मोहोळ आहे. त्याच्या घरात आजोबांपासून कुस्तीची परंपरा आहे. सिकंदरचे वडील रशिद शेखही पैलवानी करायचे. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत सिकंदर शेखने कुस्तीचे धडे गिरवले.

तसंच हा पठ्ठ्या आता महाराष्ट्र केसरी या कुस्तीतल्या मानाच्या पुरस्काराचा मानकरी ठरला आहे. २२ वर्षांचा सिकंदर शेख हा कोल्हापुरातल्या गंगावेश तालमीतला पैलवान आहे. लहान वयातच त्याने मातब्बर पैलवानांना चितपट केलं आहे. सिकंदरची घरची परिस्थिती हलाखीची होती. मात्र आई आणि वडील या दोघांनीही त्याला पैलवान होण्यासाठी प्रोत्साहन दिलं. २०१८ मध्ये मोहोळमध्ये सिकंदरने कुस्तीचा सराव सुरु केला होता. त्याच्या बरोबरीचे पैलवान त्यावेळी तालमीत नव्हते. त्यामुळे सिकंदरच्या वडिलांनी आणि वस्तादांनी कोल्हापुरातल्या

### चार जणांची चौकशी समिती

**» सिकंदर शेख आणि गतविजेता शिवराज राक्षे यांच्यात चुरशीचा सामना झाला. अवघ्या काही क्षणांमध्ये सिकंदर शेखरने शिवराज राक्षेला आस्मान दाखवलं आणि महाराष्ट्र केसरीची मानाची गदा तसंच महिंद्रा थार ही गाडी मिळवली. माझ्या विजयाचं श्रेय माझे वडील आणि माझे कोच यांना जातं. मी मागचे सहा ते सात महिने कसून सराव केला. मला आता देशासाठी मेडल आणण्याची इच्छा आहे असं सिकंदर शेखने म्हटलं आहे.**

गंगावेश तालमीत त्याला पाठवण्याचा निर्णय घेतला. कोल्हापुरातल्या गंगावेश तालमीत आल्यापासूनच त्याच्या पैलवानीला सुरुवात झाली. कुस्तीची पंढरी मानली जाणाऱ्या कोल्हापुरातल्या गंगावेश तालमीत मेहनत घेणाऱ्या सिकंदर शेखने अवघ्या २२ सेकंदात ६६ व्या महाराष्ट्र केसरीचा किताब पटकवला.अंतिम फेरीच्या लढतीत सिकंदर शेखने प्रतिस्पर्धी शिवराज राक्षेला २२ व्या सेकंदाला झोळी डावावर चितपट केले. माती विभागातून संदीप मोटेचा पराभव करुन सिकंदर शेखने अंतिम फेरी गाठली होती. तर गादी विभागातून हर्षद कोकाटेला पराभवाची धूळ चारत शिवराज राक्षे दुसऱ्यांदा महाराष्ट्र केसरीच्या अंतिम फेरीत धडकला होता. या दोघांमधली लढत अत्यंत चुरशीची झाली. या लढतीत शिवराज राक्षेचा पराभव करत सिकंदर शेखने मैदान मारलं आणि महाराष्ट्र केसरीच्या गदेवर आपलं नाव कोरलं.

# अधिष्ठाता डॉ. ठाकूर यांची उचलबांगडी!

## सरकारने ससूनचे डॉ. देवकाते यांचे केले निलंबन

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
ससून सर्वोपचार रुग्णालयातील कैदी पलायन प्रकरणात अधिष्ठाता डॉ.संजीव ठाकूर आणि अस्थिव्यंगोपचार विभागातील पथकप्रमुख डॉ. प्रवीण देवकते यांच्यासह इतर अधिकारी दोषी आढळले आहेत. या प्रकरणी राज्य सरकारने डॉ. ठाकूर यांना पदमुक्त केले असून, डॉ.देवकाते यांना निलंबित केले आहे. ससून रुग्णालयातून अमली पदार्थ तस्करी प्रकरणाचा सूत्रधार ललित पाटील याने पलायन केल्याप्रकरणी राज्य सरकारने चार जणांची चौकशी समिती ११ ऑक्टोबरला नियुक्त केली होती. या समितीच्या अध्यक्षपदी वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे प्रभारी संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर होते. ही समिती १५ दिवसांत चौकशी करून सरकारला अहवाल सादर करणार होती. समितीचे अध्यक्ष डॉ. म्हैसेकर यांनी १५ दिवस संपताच तातडीने २७ ऑक्टोबरला चौकशी अहवाल वैद्यकीय शिक्षण आयुक्त राजीव निवतकर यांना सादर केला होता. हा अहवाल निवतकर यांच्याकडून वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव दिनेश वाघमारे यांच्याकडे पाठवला जाणार होता. वाघमारे हे परदेश दौऱ्यावर होते. ते परतल्यानंतर ३ नोव्हेंबरला




हा अहवाल त्यांच्यासमोर सादर करण्यात आला. नंतर वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ हे दौऱ्यावर होते. ते दौऱ्यावरून परतल्यानंतर त्यांच्याकडे अखेर ८ नोव्हेंबरला अहवाल सादर करण्यात आला. त्यानंतर शुक्रवारी राज्य सरकारने ससूनचे अधिष्ठाता डॉ.ठाकूर यांना पदमुक्त केले तर डॉ. देवकाते यांचे निलंबन केले. दरम्यान, ससूनचे अधिष्ठाता डॉ. ठाकूर यांची नियुक्ती उच्च न्यायालयाने शुक्रवारी रद्द केली. याप्रकरणी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने (मॅट) दिलेल्या आदेशाला डॉ. ठाकूर यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. उच्च न्यायालयाने ठाकूर यांच्या विरोधात निकाल दिल्याने तत्कालीन अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांच्या पुनर्नियुक्तीचा मार्ग खुला झाला आहे. ससून

**“ पुण्यातील ससून सर्वोपचार रुग्णालय चौकशी समितीचा अहवाल शासनास सादर झाला. त्यामध्ये अधिष्ठाता डॉ.संजीव ठाकूर, अस्थिव्यंगोपचारशास्त्र पथकप्रमुख डॉ. प्रवीण देवकाते व इतर अधिकारी दोषी आढळले आहेत. त्यामुळे डॉ.ठाकूर यांना पदमुक्त तर डॉ.देवकाते यांचे निलंबन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.**

**—दिनेश वाघमारे,**
**सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग**

रुग्णालयातून अमली पदार्थ तस्करी प्रकरणाचा सूत्रधार ललित पाटील याने पलायन केल्याप्रकरणी राज्य सरकारने चार जणांची चौकशी समिती ११ ऑक्टोबरला नियुक्त केली होती. या समितीच्या अध्यक्षपदी वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे प्रभारी संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर होते. ही समिती १५ दिवसांत चौकशी करून सरकारला अहवाल सादर करणार होती. समितीचे अध्यक्ष डॉ. म्हैसेकर यांनी १५ दिवस संपताच तातडीने २७ ऑक्टोबरला चौकशी अहवाल वैद्यकीय शिक्षण आयुक्त राजीव निवतकर यांना सादर केला होता.

# राज्यातील संरक्षित स्मारकांचे १० वर्षांसाठी आता संस्थांना पालकत्व!

## राज्य शासनाकडून 'महाराष्ट्र वैभव' योजनेत सुधारणा

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्यातील प्राचीन स्मारके, किल्ले, लेणी, शिलालेख, पारंपरिक कला अशा वारशाच्या जपणुकीसाठीची 'महाराष्ट्र वैभव – राज्य संरक्षित स्मारक योजना' सुधारित करण्यात आली आहे. त्यानुसार या योजनेत संरक्षित स्मारकांच्या संगोपनासाठी केवळ संस्थांना मुभा असेल, संरक्षित स्मारकांचे पालकत्व १० वर्षांसाठी घेता येईल, संरक्षित स्मारकाच्या परिसरात सुविधा आणि प्रकाश-ध्वनी कार्यक्रम, प्रदर्शन अशा उपक्रमांचे आयोजन पुरातत्त्व विभागाच्या परवानगीने करावे लागतील, असे बदल करण्यात आले आहेत. राज्य शासनातर्फे महाराष्ट्र वैभव-राज्य संरक्षित स्मारक योजना राबवण्यात येते. मात्र या योजनेत काळानुरूप सुधारणांची गरज लक्षात घेऊन काही बदल करण्यात आले आहेत.

त्याबाबतचा शासन निर्णय पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाने नुकताच प्रसिद्ध केला. राज्यातील संरक्षित स्मारकांचे जतन, दुरुस्ती, देखभाल, सुशोभीकरण, देखभालीसाठी लोकसहभाग मिळवणे, विविध संस्थांना स्मारकांचे पालकत्व घेण्यास प्रोत्साहन देणे, पर्यटकांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा देणे, राज्यातील समृद्ध वारशाच्या जपणुकीबाबत जागृती निर्माण करण्याचे या योजनेचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार पुरातत्त्व विभागाने संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेल्या सर्व स्मारक, स्थळांना ही योजना लागू आहे. योजनेअंतर्गत स्मारकांची मूळ मालकी शासनाची राहील. स्मारकाचे पालकत्व घेण्याची मुभा केवळ संस्थांना असेल. खासगी मालकीचे राज्य संरक्षित स्मारकाचे पालकत्व प्राधान्याने संबंधित खासगी



मालकाला द्यावे लागेल. त्याची इच्छा नसल्यास त्याचे ना हरकत प्रमाणपत्र घेऊन अन्य संस्थेला पालकत्व देता येईल. संरक्षित स्मारकाच्या दुरुस्तीच्या कामाचे पालकत्व घेणाऱ्या संस्थेसह पुरातत्त्व विभागाला करार करावा लागेल. संरक्षित स्मारकाच्या परिसरात घनकचरा व्यवस्थापन, जनसुविधा केंद्र, स्वच्छता-सुरक्षा, देखभाल, वास्तूचे माहितीफलक, पर्यटकांसाठी साहसी खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, ध्वनी-प्रकाश कार्यक्रम आदी कामे पुरातत्त्व विभागाच्या परवानगीने आणि देखरेखीखाली करावी लागतील. स्मारकाचे पालकत्व १० वर्षांसाठी घेता येईल. मात्र, संबंधित संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याची, पालकत्व काळातील आर्थिक नियोजन याची तपासणी पुरातत्त्व विभागाकडून केली जाईल. या योजनेसाठी राज्य सल्लागार मंडळाची नियुक्ती करावी लागणार असून, पालकत्व घेणाऱ्या संस्थांना राज्यस्तरावर मान्यता देण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. स्मारकाचे पालकत्व घेणाऱ्या संस्थेला स्मारकाचे प्रतीकचिन्ह व्यवसायाच्या जाहिरातीसाठी वापरता येईल. स्मारकाच्या

> "महाराष्ट्र वैभव योजनेत आतापर्यंत व्यक्तिगत स्वरुपात निधी देता येत होता. मात्र, आता ही योजना संस्थांना खुली करण्यात आली आहे. पूर्वीचा पालकत्वाचा पाच वर्षांचा कालावधी आता १० वर्षांपर्यंत वाढवण्यास सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, विभागाचे सचिव विकास खारगे यांनी मान्यता दिली. तसेच सुविधा निर्मितीबाबतही स्पष्टता देण्यात आली आहे. त्यामुळे आता योजना प्रभावीरीत्या राबवता येईल.
>
> – डॉ. तेजस गर्गे,
> संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग

दुरुस्ती किंवा इतर कामातील सहभागाबाबतचा फलक स्मारकात किंवा स्मारकाच्या आवारात पालकत्वाच्या कालावधीतच लावता येईल. त्या फलकाच्या मसुद्याला पुरातत्त्व विभागाची परवानगी घ्यावी लागेल. पालकत्व कालावधीत स्मारकाचे छायाचित्रण, चित्रीकरण करण्याचा, त्याचा उपयोग दिनदर्शिका, डायरी अशा प्रकाशनांमध्ये करता येईल. पर्यटकांसाठी प्रवेशशुल्क, वाहन शुल्कआकारणी, प्रकाश-ध्वनी योजना, साहसी खेळांची व्यवस्था, स्मारकाला हानी पोहोचणार नाही अशा प्रकारे निवास-उपाहारगृह व्यवस्था, दुर्मिळ दस्तावेजांचे प्रदर्शन, कार्यक्रम आयोजित करता येईल. मात्र प्रवेश-वाहन शुल्काची रक्कम ठरवणे, मुदतीत लेखापरीक्षण करून शासनाला सादर करणे या बाबी शासन सल्ल्याने ठरवण्यात याव्यात, असे नमूद करण्यात आले आहे.

# एमपीएससीकडून स्पर्धा परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर

## उमेदवारांनो अभ्यासाला लागा..!

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) पुढील वर्षी, २०२४ मध्ये होणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर केले. त्यानुसार महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २८ एप्रिल रोजी घेतली जाणार असून, राज्यसेवा मुख्य परीक्षा १४ ते १६ डिसेंबर या कालावधीत नियोजित आहे.



स्पर्धा परीक्षांची तयारी उमेदवारांना योग्य रितीने करता येण्यासाठी, परीक्षांचा अंदाज येण्यासाठी एमपीएससीकडून दरवर्षी संभाव्य वेळापत्रक प्रसिद्ध केले जाते. त्यानुसार २०२४मध्ये एमपीएससीतर्फे १६ परीक्षा आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट-क सेवा संयुक्त परीक्षा, महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा परीक्षा, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षा अशा परीक्षांचा समावेश आहे. संभाव्य वेळापत्रकात परीक्षेचे स्वरुप, जाहिरात प्रसिद्ध होण्याचा महिना नमूद करण्यात आला आहे. शासनाकडून संबंधित संवर्ग किंवा पदांसाठी विहित वेळेत मागणीपत्र प्राप्त होईल, या गृहितकाच्या आधारे संभाव्य वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. शासनाकडून वेळेत मागणीपत्र प्राप्त झाल्यासच नियोजित वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा घेणे शक्य होईल. परीक्षेद्वारे भरावयाच्या पदसंख्येबाबतचा तपशील अधिसूचना, जाहिरातीद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल. हे वेळापत्रक संभाव्य असून त्यामध्ये बदल होऊ शकतो. तसा बदल झाल्यास त्याबाबतची माहिती संकेतस्थळावर देण्यात येणार असल्याचे एमपीएससीने स्पष्ट केले.